नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०८/२०२६ ( रविवार )**

---

## पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## २१ नायलॉन मांजा चक्री १२ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोस्टे अरोली :–** दिनांक २२/०८/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा अरोली येथे आरोपी हेमंत बबन बावनकुळे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. १, बाजार चौक अरोली हा आपले राहते घरी प्रतिबंधक नायलॉन मांजा (धागा) विक्री करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे अरोली पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन आरोपीचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता घरातील हॉल मध्ये एका पिवळया रंगाच्या प्लास्टीक बोरीमध्ये प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून २१ नग नायलॉन मांजा चक्रीसह किंमती १२,६००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी आरोपी हेमंत बबन बावनकुळे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. १, बाजार चौक अरोली याचे विरूध्द कलम २२३ (अ) भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे.**




## डायल ११२ आपात्कालीन तक्रार सुविधा क्रमांकावर खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :–** शासकीय आपत्कालीन तक्रार सुविधा डायल ११२ (Dial 112) वर कॉलरला भावाने चाकु ने मारहाण केली आहे व कॉलरला आता अँम्ब्युलेन्स व पोलीस मदत हवी आहे. अशी खोटी माहिती देऊन पोलीस प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या अंकित पदमाकर लोखंडे, वय २५ वर्ष, रा. टेभरी, पोस्ट रामा आलागोंडी बेला, ता., जि नागपूर ह. मु. दुर्गा माता मंदीर बुट्टीबोरी, ता. जि. नागपूर या युवकाविरुद्ध बुट्टीबोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकरणाची हकीकत याप्रमाणे आहे की, २२/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास डायल ११२ च्या कंट्रोल रूमला एका कॉलद्वारे माहिती मिळाली की, बुट्टीबोरी येथील दुर्गा माता, पाण्याची टाकी जवळ भावाने कॉलरला चाकुने मारहाण केली आहे. व कॉलरला आता अँम्ब्युलेन्स व पोलीस मदत हवी आहे. अशी माहीती दिली होती.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनात बुट्टीबोरी पोलीसांनी तात्काळ दखल घेत बुट्टीबोरी पोलीस ठाण्यातील पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. मात्र नमूद ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडल्याचे दिसून आले नाही. पोलिसांनी आरोपीस दुर्गा माता मंदीर पाण्याची टाकी येथुन ताब्यात घेतले. विचारपूस केली असता, त्याने पोलिसांना डायल ११२ वर खोटी माहिती दिल्याची कबुली दिली.

सदर प्रकरणात बुट्टीबोरी पोलीसांनी आरोपी अंकित पदमाकर लोखंडे, वय २५ वर्ष, रा. टेभरी, पोस्ट रामा आलागोंडी बेला, ता., जि नागपूर ह. मु. दुर्गा माता मंदीर बुट्टीबोरी, ता. जि. नागपूर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता च्या कलम २१७ अन्वये शासकीय यंत्रणेची दिशाभूल करून लोकसेवकास नाहक त्रास होण्याच्या उद्देशाने खोटी माहिती दिल्याने सदर प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १७ गुन्हे नोंद

दिनांक २२/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) दिनेश मधुकर शेंडे, वय ३० वर्ष, रा. डहाळी ता. मौदा २) धनराज बाबुराव बावने, वय ४७ वर्ष, रा. खडकी, पो. पालोरा, ता. मोहाडी, जि. भंडारा यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी नामे १) अमोल भिमरावज बनसिंगे, वय ३४ वर्ष, रा. अंबाडा देशमुख, तह. नरखेड २) हेमराज रामचंद्र देवुळकर, वय ४१ वर्ष, रा. सावरगाव, तह. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** आरोपी नामे १) सतिश बेनीप्रसाद रावत, वय ३० वर्ष, रा. जामगाव, ता. नरखेड, व ०३ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** आरोपी नामे ज्ञानेश्वर जिवत भलावी, वय ३४ वर्ष, रा. भिमगड, त. पारशिवनी याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली येथे** आरोपी नामे प्रकाश हरीचंद भिवगडे, वय ४२ वर्ष, रा. धर्मापुर, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला येथे** आरोपी नामे दिपक प्रकाश क्षिरसागर, वय ३२ वर्षे, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** आरोपी नामे १) अमित गोविंदा लोंखंडे, वय २६ वर्ष, रा. लीना लेआउट उमरेड २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन केळवद येथे** आरोपी नामे १) रोशन ब्रम्हानंद नेहारे, वय २२ वर्ष, वय ४५ वर्ष, रा. छत्रापुर, ता. सावनेर, जि. नागपूर २) भिमराव चिंदबाजी जिवतोडे, वय ५७ वर्ष, रा. सावळी (मो.), ता. सावनेर, जि. नागपुर ३) दत्तात्रे निळकंठराव मुरके, वय ५८ वर्ष, रा. मौजा जटामखेरा शिवारातील शेतात, ता. सावनेर, जि. नागपुर ४) विशाल ज्ञानेश्वर काटे, वय १९ वर्ष, रा. मेंढला पोष्ट– जलालखेडा, ता. नरखेड, जि. नागपुर, ह. मु. विरतेजा राजस्थानी हॉटेल, पांढुर्णा रोड, ता. सावनेर, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ६२१० मिली देशी दारू, ४५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ७६००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने